# ३. कीर्ती कठीयाचा दृष्टान्त

**म्हाइंभट (तेरावे शतक)** : मराठीतील पहिले चरित्रकार. महानुभाव पंथाचे प्रवर्तक. महात्मा चक्रधरांचे निष्ठावान अनुयायी. चक्रधरांच्या उत्तरापंथ प्रयाणानंतर नागदेवाचार्यांच्या सहकार्याने अनुयायांकडून चक्रधरांच्या आठवणींचे परिश्रमपूर्वक संकलन करून 'लीळाचरित्र' हा मराठीतील पहिला चरित्रग्रंथ लिहिला. नंतर 'गोविंदप्रभूचरित्र'ही लिहिले. महानुभाव पंथाचे तत्त्वज्ञान, तत्कालीन सामाजिक-सांस्कृतिक परिस्थिती, भाषा व समाजजीवन यांच्या अभ्यासाच्या दृष्टीने 'लीळाचरित्र' हा अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ आहे.

कोणताही जीव विकारापासून वेगळा राहत नाही, हे स्पष्ट करण्यासाठी प्रस्तुत लीळेत चक्रधर स्वामींनी 'कीर्ती कठीयाचा दृष्टान्त' सांगितलेला आहे. कोणत्याही कार्याचा आणि व्रतस्थपणाचा अहंकार बाळगणे हा सुद्धा विकारच आहे, हे प्रस्तुत लीळेतून पटवून दिले आहे.

डोमग्रामी गोसावीयांचा ठायी उदयाचे मातीकाम होत होते: ते सी बाजत होते: तेणे भक्तीजनासी व्यापार होववे ना: आन भट व्यापार करु लागले: नाथोबाए म्हणीतलें: ''नागदेया: तू कैसा काही हींवसी ना?'' तवं भटी म्हणीतलें: ''आम्ही वैरागी: काइसीया हीवु:'' यावरी सर्वज्ञें म्हणीतलें: ''वानरेया: पोरा **जीवासी वैराग्य मिरवु आवडे: हाही एकू विकारुचि कीं गा:**'' यावरि भटी म्हणीतलें: ''जी जी: निर्वीकार तो कवण:'' सर्वज्ञें म्हणीतलें: ''वानरेया: पोर **जीव वीकारावेगळा केव्हेळाही जालाचि नाही:** मा तु काइ वेगळा अससि:'' ''हो कां जी:'' यावरि गोसावी कीर्ती कठीयाचा दृष्टान्त निरोपीला: **''कव्हणी एकू कठीया असे: तो भोगस्थानाची सुश्रुषा करी: झाडी: सडा संमार्जन करी: ते देखौनि गावीचे म्हणति: 'कठीये हो नीके करीत असा: बरवे करीत असा:' ते आइकौनि दीसवडीचा दीसवडी हात हात चढवी: तयासि देवता आपुले फळ नेदी: तयासि कीर्तीचेचि फळ झाले:''**

[लीळाचरित्र उत्तरार्ध : एकांक लीळा क्र. १२०]

संपादक-प्रा. पुरुषोत्तम नागपुरे.

## स्वाध्याय

**प्र. १. कोणांस उद्देशून म्हटले आहे ते लिहा.**

(१) वानरेया – [ ]
(२) सर्वज्ञ – [ ]
(३) गोसावी – [ ]

**प्र. २. आकृती पूर्ण करा.**

[ ] ← कठीयाची जाणवलेली स्वभाव वैशिष्ट्ये → [ ]

**प्र. ३. प्रस्तुत दृष्टान्तातील उपदेश तुमच्या शब्दांत सांगा.**

**प्र. ४. पुढील शब्दांना प्रमाणभाषेतील शब्द सांगा.**

कठीया | सी | काइसीया | कव्हणी

**प्र. ५. 'आपल्यातील गुण हाच अवगुण होऊ शकतो', हा विचार प्रस्तुत पाठाच्या आधारे स्पष्ट करा.**

**प्र. ६. पाठातील दृष्टान्त वेगळ्या उदाहरणाद्वारे स्पष्ट करा.**

## भाषाभ्यास

### (२) व्यतिरेक अलंकार :

खालील उदाहरण वाचा व समजून घ्या.
उदा., 'अमृताहुनि गोड नाम तुझे देवा'
वरील उदाहरणातील उपमेय–[ ] उपमान–[ ]

- **व्यतिरेक अलंकाराचे वैशिष्ट्य–** उपमेय हे उपमानापेक्षा श्रेष्ठ असते.
  वरील उदाहरणात परमेश्वराचे नाव गोडीच्या बाबतीत अमृतापेक्षाही श्रेष्ठ आहे, असे मानले आहे.
- **जेव्हा कोणत्याही काव्यात वा वाक्यात उपमेय हे उपमानापेक्षा श्रेष्ठ आहे, असे मानले जाते तेव्हा तिथे 'व्यतिरेक' अलंकार होतो.**
- **खालील उदाहरण अभ्यासा व तक्ता पूर्ण करा.**

तू माउलीहून मयाळ । चंद्राहूनि शीतल ।
पाणियाहूनि पातळ । कल्लोळ प्रेमाचा ।।

| उपमेय | उपमान | समान गुण |
|---|---|---|
| तू (परमेश्वर/गुरू) | | |
| | चंद्र | |
| | | पातळपणा |